# रंगदीप

## <u>दिवाळी अंक - २०२२ साठी आवाहन</u>

## NEW DATE OF SUBMISSION: September 10th, 2022

**नमस्कार,**

'मराठी विश्व, न्यू जर्सी' (स्थापना - १९७८) आणि 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' (स्थापना - १९७०) यांच्या 'रंगदीप' या दिवाळी अंकाचे आजवर एकतीस अंक प्रकाशित झाले आहेत. या दोन्ही मंडळांकडून सामायिकरित्या प्रसिध्द होणाऱ्या या वर्षीच्या दिवाळी अंकासाठी स्वत:चे मराठी साहित्य किंवा कलाकृती पाठवण्याचे आवाहन आम्ही सर्व मराठी बांधवांमधे दडलेल्या लेखक, कवी, चित्रकार यांना करत आहोत.

यापुढे कळत्या वयातील सर्व पिढ्यांसाठी जगण्याचा काळ हा कोव्हिड-पूर्व आणि कोव्हिड-पश्चात अशा दोन खंडांत विभागला जाणार आहे. आपण सर्वजण जवळपास दीड ते दोन वर्ष कोव्हिड नामक भयाच्या सावटाखाली राहिलो आहोत. ती भीती अजूनही पूर्णपणे संपलेली नसली तरी आता आपण कोव्हिडच्या शृंखलांमधून बाहेर पडून आपले आयुष्य पूर्ववत जगायला शिकलो आहोत. ज्याप्रमाणे रात्रीनंतर दिवस उगवतो, त्याचप्रमाणे भयानंतर स्वातंत्र्याचा अविष्कार झाल्याशिवाय रहात नाही. अशाच एका भयाचा विनाश होऊन स्वातंत्र्याची पहाट उगवली होती - पंचाहत्तर वर्षांपूर्वी! या वर्षी भारतीय स्वातंत्र्य त्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहे. रंगदीपसाठी यापेक्षा औचित्यपूर्ण संकल्पना दुसरी काय असू शकते! त्यामुळेच या वर्षीच्या रंगदीपसाठी आपण '**भय आणि स्वातंत्र्य**' ही मध्यवर्ती संकल्पना निवडलेली आहे. 'भय' आणि 'स्वातंत्र्य' या विरोधाभासी संकल्पना आहेत. जिथे भय असते तिथे स्वातंत्र्य असू शकत नाही आणि स्वातंत्र्यामध्ये भय या संकल्पनेला थारा नाही. भय हे वेगवेगळ्या स्वरूपात आपल्या आजूबाजूला असते. आपल्याच समजुतींचे भय, समाजाचे भय, बंधनांचें भय, सत्तेचे भय. स्वातंत्र्यदेखील असेच विविध रूपात आपल्याला दिसते; आचार-विचार-उच्चार स्वातंत्र्य, अविष्कार स्वातंत्र्य...

देशाचे स्वातंत्र्य हा तर महत्वाचा विषय आहेच, पण आपणा सर्वांच्या सिद्धहस्त लेखणीतून किंवा कुंचल्यातून आपण भय आणि स्वातंत्र्याचे वेगवेगळे दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्यांचे वेगवेगळे अर्थ वेगवेगळ्या संदर्भात कसे लागतात किंवा बदलतात हे तपासायचा प्रयत्न करणार आहोत. या संदर्भातल्या किंवा या व्यतिरिक्त आपल्या आवडीच्या विषयांवरील साहित्याचेही स्वागत आहे. आपल्या सर्वांसाठी काही विषयांची उदाहरणे देत आहोत.

**उदाहरणार्थ:**

- भय - साहित्याच्या नवरसांपैकी एक रस. याचा वापर करून लिहीलेल्या कथा, कविता, लेख, अनुभव इत्यादी.

- भय या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ लावणारे लेख, कथा, कविता इत्यादी.
- स्वातंत्र्य या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ शोधणारे लेख, कथा, कविता इत्यादी.
- या विषयांवरील तुम्हाला आवडलेले साहित्य, साहित्यिक अथवा कलाकृती (चित्रपट, नाटक, कविता) यांचे सोप्या भाषेतील विश्लेषण (मूळ कलाकृतीचे आणि लेखकाचे/अविष्कारकर्त्यांचे/ दिग्दर्शकाचे नाव देणे आवश्यक आहे. उदा. रत्नाकर मतकरी, आल्फ्रेड हिचकॉक इत्यादी).
- वेगवेगळ्या स्वातंत्र्यलढ्यांबद्दल माहितीपूर्ण लेख/कथा इत्यादी (विशेषतः राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक, आर्थिक, नागरी किंवा ग्राहक हक्कांचे लढे, चळवळी).
- भारतीय स्वातंत्र्याबद्दल जनमानसात माहित नसलेल्या नोंदी/ घटना/ कथा इत्यादी.
- शक्यतो यावर्षीच्या संकल्पनेला अनुसरून साहित्य येणे अपेक्षित आहे. परंतु या व्यतिरिक्त आपल्या आवडीच्या इतर विषयांवरचे लेख, कथा, कविता यांचेही स्वागत आहे.

**साहित्य शब्दमर्यादा:** कथा/लेख (१२०० शब्द), कविता (२० ओळी), पारंपारिक पाककृती (३०० शब्द). प्रत्येक साहित्यिकाची फक्त एकच कलाकृती प्रकाशित केली जाईल.

*__वेगळ्या वाटा:__ विविध क्षेत्रांत लक्षणीय कर्तृत्व गाजवून इथल्या मातीत झेंडा रोवणाऱ्या मराठी व्यक्तींवर लेख. उदाहरणार्थ: मराठी कलाकार, शास्त्रज्ञ, व्यावसायिक, तंत्रज्ञ, चिकित्सक/वैद्य, शिक्षक, अन्य कुठल्याही क्षेत्रात चमकलेले मराठी बांधव, महाराष्ट्रातील अथवा अमेरिकेतील NGO, इत्यादी.

*** नवदीप /The Youth Corner:** मुलांच्या आवडीच्या कुठल्याही विषयांचे स्वागत आहे.

We are excited to invite second generation Marathi American kids/ teens/ youth to contribute to the 'Youth Corner'. Please send your original unpublished work such as short-stories, poems, articles, recipes in Marathi or English as well as drawings, paintings, cartoons, photos etc. Please send your material by ~~August 31*2022.~~ **(September 10, 2022)**

**नवदीप-Youth Corner सहसंपादक:** किशोरवयीन साहित्य आणि कल्पनाशक्तीला वाव देण्याच्या उद्देशाने आम्ही या वर्षी नवदीप-Youth Corner साठी '**किशोर-संपादक**' अशी जागा निर्माण करत आहोत. या जागेसाठी १५ ते १७ वर्षे वयोगटातील इच्छुकांनी **३१ जुलैपर्यंत** **rd2022editors@gmail.com** या इ-मेलवर संपर्क साधावा.

## साहित्य पाठवण्याचे नियम आणि मुदत

१. साहित्य स्वत:चे असावे; इतरत्र कुठेही छापील अथवा समाज माध्यमांवर (social media) पूर्वप्रकाशित नसावे. रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.

२. आपल्या साहित्यात कुठलेही चित्र (Image) वापरायचे असेल तर ते png/jpeg format मधे पाठवावे. चित्र आंतरजालावरून (Internet) घेतलेले असल्यास त्याची नोंद करावी (To avoid plagiarism). Copyright requirement असल्यास आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.

३. साहित्य युनिकोडमध्ये (गुगल मराठी) टंकित करुन पाठवावे. पीडीएफ (PDF), हस्तलिखित असे फॉरमॅट वापरल्यास पुढची प्रक्रिया करणे अवघड जात असल्याने अशा साहित्याचा स्वीकार करता येणार नाही.

४. साहित्याच्या निवडीत समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुद्धलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क समितीला आहे. कोणत्याही जात, धर्म, व्यक्ती, समूह यांच्या भावना दुखावल्या जातील अशा प्रकारचे साहित्य कृपया पाठवू नये.

- भय या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ लावणारे लेख, कथा, कविता इत्यादी.
- स्वातंत्र्य या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ शोधणारे लेख, कथा, कविता इत्यादी.
- या विषयांवरील तुम्हाला आवडलेले साहित्य, साहित्यिक अथवा कलाकृती (चित्रपट, नाटक, कविता) यांचे सोप्या भाषेतील विश्लेषण (मूळ कलाकृतीचे आणि लेखकाचे/अविष्कारकर्त्याचे/ दिग्दर्शकाचे नाव देणे आवश्यक आहे. उदा. रत्नाकर मतकरी, आल्फ्रेड हिचकॉक इत्यादी).
- वेगवेगळ्या स्वातंत्र्यलढ्यांबद्दल माहितीपूर्ण लेख/कथा इत्यादी (विशेषतः राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक, आर्थिक, नागरी किंवा ग्राहक हक्कांचे लढे, चळवळी).
- भारतीय स्वातंत्र्याबद्दल जनमानसात माहित नसलेल्या नोंदी/ घटना/ कथा इत्यादी.
- शक्यतो यावर्षीच्या संकल्पनेला अनुसरून साहित्य येणे अपेक्षित आहे. परंतु या व्यतिरिक्त आपल्या आवडीच्या इतर विषयांवरचे लेख, कथा, कविता यांचेही स्वागत आहे.

**साहित्य शब्दमर्यादा:** कथा/लेख (१२०० शब्द), कविता (२० ओळी), पारंपारिक पाककृती (३०० शब्द). प्रत्येक साहित्यिकाची फक्त एकच कलाकृती प्रकाशित केली जाईल.

***वेगळ्या वाटा:** विविध क्षेत्रांत लक्षणीय कर्तृत्व गाजवून इथल्या मातीत झेंडा रोवणाऱ्या मराठी व्यक्तींवर लेख. उदाहरणार्थ: मराठी कलाकार, शास्त्रज्ञ, व्यावसायिक, तंत्रज्ञ, चिकित्सक/वैद्य, शिक्षक, अन्य कुठल्याही क्षेत्रात चमकलेले मराठी बांधव, महाराष्ट्रातील अथवा अमेरिकेतील NGO, इत्यादी.

*** नवदीप /The Youth Corner:** मुलांच्या आवडीच्या कुठल्याही विषयांचे स्वागत आहे.

We are excited to invite second generation Marathi American kids/ teens/ youth to contribute to the 'Youth Corner'. Please send your original unpublished work such as short-stories, poems, articles, recipes in Marathi or English as well as drawings, paintings, cartoons, photos etc. Please send your material by ~~August 31*2022.~~ **(September 10, 2022)**

**नवदीप-Youth Corner सहसंपादक:** किशोरवयीन साहित्य आणि कल्पनाशक्तीला वाव देण्याच्या उद्देशाने आम्ही या वर्षी नवदीप-Youth Corner साठी '**किशोर-संपादक**' अशी जागा निर्माण करत आहोत. या जागेसाठी १५ ते १७ वर्षे वयोगटातील इच्छुकांनी **<u>३१ जुलैपर्यंत</u>** **rd2022editors@gmail.com** या इ-मेलवर संपर्क साधावा.

## <u>साहित्य पाठवण्याचे नियम आणि मुदत</u>

१. साहित्य स्वत:चे असावे; इतरत्र कुठेही छापील अथवा समाज माध्यमांवर (social media) पूर्वप्रकाशित नसावे. रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.

२. आपल्या साहित्यात कुठलेही चित्र (Image) वापरायचे असेल तर ते png/jpeg format मधे पाठवावे. चित्र आंतरजालावरून (Internet) घेतलेले असल्यास त्याची नोंद करावी (To avoid plagiarism). Copyright requirement असल्यास आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.

३. साहित्य युनिकोडमध्ये (गुगल मराठी) टंकित करुन पाठवावे. पीडीएफ (PDF), हस्तलिखित असे फॉरमॅट वापरल्यास पुढची प्रक्रिया करणे अवघड जात असल्याने अशा साहित्याचा स्वीकार करता येणार नाही.

४. साहित्याच्या निवडीत समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुद्धलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क समितीला आहे. कोणत्याही जात, धर्म, व्यक्ती, समूह यांच्या भावना दुखावल्या जातील अशा प्रकारचे साहित्य कृपया पाठवू नये.

५. साहित्याबरोबर स्वत:चा संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-मेल पाठवणे आवश्यक आहे.

६. उत्तर अमेरीकेतील साहित्यिक/कलाकार यांना प्राधान्य दिले जाईल.

७. साहित्य अथवा कलाकृतीसाठी मानधन दिले जात नाही.

८. साहित्य, जाहिराती आणि शुभेच्छा संदेश पाठवण्याची **अंतिम तारीख: ~~३१ ऑगस्ट २०२२.~~**

## वाढीव मुदत सप्टेंबर १०. २०२२

९. अंकासाठी स्वीकारलेल्या साहित्यापैकी उत्कृष्ट लेख/कविता यांना **'संपादकांची पसंती'**ने गौरविण्यात येईल.

### रंगदीप स्पर्धा

**काव्यस्फूर्ती (कविता स्पर्धा):** या वर्षी आम्ही एक अनोखी काव्यस्फूर्ती स्पर्धा घेऊन आलो आहोत. या स्पर्धेअंतर्गत खाली दिलेल्या दोन चित्रांपैकी कोणत्याही एका चित्रावर आधारीत स्वतः रचलेली एक कविता आम्हाला पाठवायची आहे. तुमची रचना २० ओळींपर्यंत मर्यादित असावी. सर्वोत्कृष्ट दोन कवितांना प्रत्येकी $१०० आणि $५० बक्षीस देण्यात येईल. **काव्यस्फूर्ती कविता पाठवण्याची अंतिम तारीख: ~~३१ ऑगस्ट २०२२~~**

## वाढीव मुदत सप्टेंबर १०. २०२२

चित्र १



चित्र २



* **<u>रंगदीप शब्दकोडे स्पर्धा:</u>** वैयक्तिक पातळीवर सर्वात मोठे शब्दकोडे तयार करण्याचा जागतिक विक्रम नावावर असलेल्या श्री. मिलिंद शिंत्रे ह्यांनी आपल्यासाठी या वर्षीचे शब्दकोडे तयार केले आहे. शब्दकोडे स्पर्धेचे नियम आणि संपर्क विषयक माहिती मराठी विश्व, न्यू जर्सीच्या संकेतस्थळावर www.marathivishwa.org ठेवण्यात येईल. **<u>स्पर्धकांनी स्वत:ची उत्तरे इ-मेलने ~~३१ ऑगस्ट~~ सप्टेंबर १०, २०२२ पर्यंत पाठवावीत.</u>** प्रत्येक अचूक शब्दकोड्याला $२५ चे रोख बक्षिस देण्यात येईल.

## <u>जाहिराती आणि शुभेच्छा संदेश देण्यासाठी संपर्क आणि दरपत्रक</u>

शीतल गायकी: Sheetal_Gaiki@yahoo.com
अनघा पेरंडे: mvnj.anagha@gmail.com

| 1 | Type | Rate | Size |
|---|---|---|---|
| 2 | Back Page (color) | $1,000.00 | 11" x 8" |
| 3 | Back Inside Cover (color) | $750.00 | 11" x 8" |
| 4 | Front Inside Cover (color) | $750.00 | 11" x 8" |
| 5 | Full Page (color) | $500.00 | 11" x 8" |
| 6 | Full Page (B&W) | $350.00 | 11" x 8" |
| 7 | Half Page (color) | $350.00 | 5.5" x 8" |
| 8 | Half Page (B&W) | $200.00 | 5.5" x 8" |

## <u>साहित्य पाठवण्यासाठी ई-मेल</u> : rd2022editors@gmail.com

'रंगदीप' घडवण्याच्या ह्या सर्जनशील कामात मराठी विश्वच्या सभासदांपैकी कुणालाही हातभार लावायची इच्छा असल्यास कृपया **rd2022editors@gmail.com** ह्या इ-मेलवर संपर्क साधावा. आपल्या सर्वांच्या सहकार्याने घडणारा रंगदीप २०२२चा अंक आपल्या पसंतीस पडेल यात शंका नाही!

धन्यवाद!

**राहुल गुणे (संपादक) आणि शिरीन म्हाडेश्वर (सहसंपादक)**
**rd2022editors@gmail.com**

**आणि 'रंगदीप २०२२' समिती**

रंगदीप २०२२ शब्दकोडे स्पर्धा

श्री. मिलिंद शिंत्रे, ज्यांच्या नावावर वैयक्तिक पातळीवर सर्वात मोठे शब्दकोडे तयार करण्याचा विश्वविक्रम आहे (मराठीतून रचलेल्या या शब्दकोड्यात एकूण १३३,००० चौकटी आणि ४३,३६० शब्द आहेत), त्यांनी या वर्षी रंगदीपसाठी शब्दकोड्याची रचना केली आहे. त्यांच्या या योगदानासाठी मराठी विश्वतर्फे त्यांचे मनःपूर्वक आभार!

रंगदीप २०२२ शब्दकोडे स्पर्धेचे नियम:

- रंगदीप २०२२ शब्दकोडे स्पर्धा उत्तर अमेरिकेमधे राहणाऱ्या सर्वांसाठी खुली आहे.
- स्पर्धेसाठी दिलेले शब्दकोडे शुद्धलेखनासहित अचूक सोडवून, दिलेल्यामुदतीमधे पाठविणाऱ्या स्पर्धकांना प्रत्येकी $२५चे E-Gift Card त्यांच्या ई-मेलवर पाठवण्यात येईल.
- उत्तरे व स्पर्धकाची माहिती स्पष्ट वाचता येणे आवश्यक आहे.
- कृपया आपली उत्तरे स्कॅन करून किंवा त्याचे छायाचित्र काढून rd2022editors@gmail.com या इमेल पत्त्यावर पाठवावित.
- सर्व स्पर्धकांना रंगदीप २०२२ कडून मनःपूर्वक शुभेच्छा

Name of the Participant:

Email ID:

Cell Ph #:

Address:

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | ७ | ■ | ८ |
| | ■ | | ■ | ९ | | | | | | | १० | |
| ११ | १२ | ■ | १३ | | | | ■ | १४ | | ■ | | ■ |
| १५ | | १६ | ■ | १७ | | ■ | १८ | | | १९ | ■ | २० |
| | ■ | | ■ | | ■ | २१ | | | | | २२ | |
| ■ | २३ | | २४ | | ■ | २५ | | ■ | ■ | २६ | | |
| २७ | ■ | २८ | | ■ | २९ | | ■ | ३० | ■ | | ■ | |
| ३१ | ३२ | ■ | ३३ | ३४ | ■ | ■ | ३५ | | ३६ | ■ | ३७ | ■ |
| ३८ | | ■ | ३९ | | | ४० | | | | | | ४१ |
| ४२ | | ४३ | | | | ■ | ४४ | | | ■ | ■ | |
| ■ | ४५ | | | | | ४६ | | ■ | | ■ | ४७ | |
| ४८ | | | ■ | ■ | ■ | | ■ | ४९ | | ५० | | |
| ५१ | | | ५२ | | ५३ | | ■ | | ■ | ५४ | | |
| ५५ | | ■ | | ■ | ५६ | | | | | | ■ | |
| ५७ | | ५८ | | ■ | | ■ | ■ | | ■ | ५९ | | |
| ६० | | | | | | | | | | | ■ | |

आडवे शब्द

१ निर्भयता

३. कालमापनाचे एक एकक

५. १९६० साली सुरु झालेली, दिल्ली येथे संपन्न होणारी, आंतरराष्ट्रीय, आंतरशालेय फूटबॉल स्पर्धा

९. भ्यायलेल्या माणसाची अवस्था सांगणारी एक म्हण.

११. बडदास्त, काळजीपूर्वक रक्षण

१३. थोर भारतीय तत्वज्ञ, महर्षि, योगाचार्य, कवी, पत्रकार, आपल्या वाढदिवशी भारत देशाला स्वातंत्र्य मिळणार आहे, असे भविष्य यांनी वर्तवले होते. [ फक्त नाव ]

१४. रेडी [ ग्रामीण उच्चार ]

१५. गवत, तृण

१७. २२ जानेवारी १९९० रोजी जन्मलेला ६ फूटांपेक्षा जास्त उंच असलेला युक्रेन देशाचा फूटबॉलपटू. [ फक्त आडनाव ]

१८. पवित्र, गूढ शक्तियुक्त अक्षरे, शब्द, वाक्य किंवा श्लोक

२१. बसण्याच्या लाकडी वस्तूतले लहान कुसळ

२३. धार लावणे, स्वाधीन ठेवणे, परवडणे

२५ . नशीब [ आंग्ल शब्द ]

२६. भार, कामाचा बोजा

२८. गणित आणि संगीत यातील एक शब्द

२९. भीती

३१. विधिपूर्वक हत्या, ठार मारणे [ मूळ अरेबिक ]

३३. या जंगली श्वापदाची भीती वाटते

३५. निर्मलता, पापरहित अवस्था

३८. व्यावसायिक आणि समांतर हिंदी चित्रपटांतून अभिनय करणारी एक अभिनेत्री

३९. भा.रा. तांबे यांनी लिहिलेले, लता मंगेशकर यांनी गायलेले, वसंत प्रभू यांनी संगीतबद्ध केलेले एक भावगीत.

४२. दोन व्यक्ती, संस्था, संघटना, देश यांनी एकमेकांबरोबर केलेला ठराव

४४. लंकेचे एक भूतपूर्व राजे.

४५. रत्नाकर मतकरी लिखित, दिलीप प्रभावळकर अभिनीत एक मराठी विनोदी नाटक

४७. बूड, जमीन

४८. खालचा भाग [ आंग्ल शब्द ]

४९. रोबो

५१. शांता शेळके यांनी लिहिलेल्या, आशा भोसले यांनी गायलेल्या एका गाण्यातील लालकाळ्या धाग्यांनी केलेल्या नक्षीकामाचे वर्णन करणारे शब्द

५४. गवई

५५. नाल, कमळाचा देठ, बेंबीचे क्षत

५६. उपासाच्या दिवशी खाल्ला जाणारा एक पदार्थ

५७. एकदाच [ ग्रामीण ]

५९. लो एनर्जी हाय इंटेन्सिटी प्रोटॉन अॅक्सलरेटर [ संक्षिप्त ]

६०. गुन्हा/चूक केलेली नसताना, भ्यायचे कारण नसते; हे सांगणारी म्हण.

उभे शब्द

१. ज्यापासून भय वाटते असे

२. फजिती, गाडी

३. झपाटलेला या चित्रपटातील एक भयरस उत्पन्न करणारी व्यक्तिरेखा

४. पायांसकट

५. भारतीय जनता पक्षाचे एक दाक्षिणात्य खासदार

६. ब्रह्मराक्षस

७. नखरा

८. नाश

९. ओरबडणे, ओरबाडणे

१०. सर्व नाशवंत पदार्थ

१२. साठी

१६. एकरूप

१८. पिसा, वेडा

१९. उन्हाच्या कवडशात दिसणारा अत्यंत सूक्ष्म रजःकण

२०. अडथळा, मनाई, बंदी

२१. सदन, घर

२२. केस

२४. अनेक गोष्टी, वस्तू, मुद्दे एकत्र करणे

२७. एक भारतीय भाषेतील वृत्तवाहिनी

३०. रागीट आवाज

३२. १००० पेक्षा जास्त रहस्यकथा लिहिणाऱ्या चंद्रकांत सखाराम चव्हाण यांनी या टोपणनावाने लेखन केले.

३४. जंगल आणि केस यांचे एक विशेषण

३५. शुभचिंतनासाठी किंवा तात्कालिन संवाद संपवण्यासाठी रात्री उच्चारायचा शब्द

३६. देवपुजेसाठी लागणाऱ्या काही वस्तू

३७. भय

४०. शेकोटी, आगटी

४१. निवडुंग या चित्रपटातील, आरती प्रभू यांनी लिहिलेले, पद्मजा फेणाणी यांनी गायलेले आणि हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेले एक गीत.

४३. भात शिजण्याचा आवाज

४६. पैसे पुरवणारा, देणारा

४७.मुलगा, पुत्र

४८. बापूजी अणे आणि जयप्रकाश नारायण यांची उपाधी

४९. यंत्र चालवणारा

५०. विकसित न झालेला

५२. व्यापाऱ्यांची हिशोब लिहिण्याची वस्तू

५३. वहिवाट

५८. अॅक्सल, ड्राइवशाफ्ट इ. उत्पादने बनविणारी, १९०४ साली स्थापन झालेली, माऊमी येथे मुख्यालय असलेली, एक अमेरिकन कंपनी

**Shabdakode Online PDF:**
https://marathivishwa.org/wp-content/uploads/2022/08/%E0%A4%B0%E0%A4%82%E0%A4%97%E0%A4%A6%E0%A5%80%E0%A4%AA-%E0%A5%A8%E0%A5%A6%E0%A5%A8%E0%A5%A8-%E0%A4%B6%E0%A4%AC%E0%A5%8D%E0%A4%A6%E0%A4%95%E0%A5%8B%E0%A4%A1%E0%A5%87-%E0%A4%B8%E0%A5%8D%E0%A4%AA%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%A7%E0%A4%BE.pdf

**Editor's Email:**
**rd2022editors@gmail.com**

**Link for Avahan and Shabdakode:**
https://marathivishwa.org/rangadeep/

**– शिरीन म्हाडेश्वर**